# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 10 **Subject:** Marathi **Time:**2 hrs
**Date:** 11-10-2025 **Paper:** Semester 1 (Solution) **Marks:**80

**1(अ))**
**(1)** (1) (1) (i) कृष्णा
(ii) पुलकित शाल
(2) बाळाला गुंडाळण्यासाठी लेखकाने आपल्या सुटकेसमधील ‘पुलकित’ शाल तसेच मदत म्हणून पाचपन्नास रुपयांच्या नोटा त्या बाईला दिल्या.
(2) (1) बाईला हाक मारून खिडकीतून शाल व नोटा दिल्या - दयाळू, परोपकारी, निर्मोही.
(2) पु. ल. देशपांडे व सुनीताबाई यांनी दिलेल्या शालीचा उल्लेख लेखक कोणत्या विशेष नावाने करीत असे?
(3) पु. ल. देशपांडे व सुनीताबाई यांनी लेखकाला एक शाल भेट दिली होती. लेखक त्या शालीला पुलकित शाल म्हणायचे कारण त्या शालीची ऊब लेखकाला पु.ल. देशपांडे आणि सुनीताबाईंची आठवण करून देत असे. जेव्हा लेखकाने बाळाला थंडीत कुडकुडताना पाहिले तेव्हा त्याला त्या बाळाची दया आली. बाळाची आई मासे पकडण्यात मग्न होती. तिचे बाळाकडे लक्षही नव्हते. हे पाहून लेखकास वाईट वाटले. त्याने लगेच आपल्या जवळ असलेली पुलकित शाल बाळाला गुंडाळण्यासाठी दिली. लेखकाला पु.ल. देशपांडे आणि सुनीताबाई यांच्या आठवणीची ऊब देणारी शाल महत्वाची होती हे खरे आहे. मात्र त्या शालीत बाळाला गुंडाळल्यानंतर तिच्या प्रत्यक्ष उबेमुळे बाळाचे खऱ्याखुऱ्या थंडीपासून संरक्षण होते आहे, याचे समाधान लेखकाला त्यापेक्षा अधिक महत्वाचे वाटते.

TickMark.Ai

**(आ))**
**(1)** (1) (1) स्वेटर, मफलर
(2) (i) असत्य (ii) सत्य
(2) (i) तपोवनाच्या कमानीचा आकार – **गोलाकार.**
(ii) अब्दूल चौथऱ्यावर कोणत्या झाडाखाली बसला – **आंब्याच्या.**
(iii) अब्दूल तपोवनात किती दिवसांनी आला – **सहा महिन्यांनी.**
(iv) अब्दूलकडे असलेल्या बांगड्यांचे रंग – **लाल, हिरव्या, निळ्या, रंगीबेरंगी.**
(3) अब्दूल एक गरीब बांगडीवाला होता. तो जसा मेहनती तसा इमानदार होता. ते थंडीचे दिवस होते. अब्दूल तपोवनला जाणाऱ्या बसमध्ये चढला. अब्दुलचा उसवलेला स्वेटर आणि मफलर त्याचे थंडीपासून संरक्षण करू शकत नव्हते. त्याला त्रास होत होता पण तो सहन करीत राहिला. बांगड्यांची पेटी त्याने खाली न ठेवता जपून आपल्या मांडीवर ठेवली. जिल्हाधिकारी कचेरीजवळ पाऊण बस रिकामी झाली. त्याला महित होते कि तपोवनला फारसं कोणी जात नाही तरी तो खाली उतरला नाही. तपोवनच्या कमानीवरबहरलेली वेळ त्याने बरोब्बर टिपली. यावरून असे दिसते कि सणासुदीच्या दिवशी दुकान बंद करून तपोवनला जाणे नुकसानकारक आहे हे माहित असूनही तो मनापासून तपोवनात जात असे.

**(इ))**
**(1)** (1) 1) - प्रकाश, 2) - पाणी, 3) - धान्य, 4) - वस्त्र
(2) (i) संयम
(ii) सृष्टी

**2(अ))**
**(1)** (1) (1) (i) परमेश्वर
(ii) गाय
(2) 'नाम म्हणे मेघ जैसा विनवितो चातक तैसा।। '
(2) (i) मेघाला विनवणी करणाऱ्या कोणत्या पक्ष्याचे नाव प्रस्तुत अभंगात आले आहे ?
(ii) संत नामदेव परमेश्वराप्रती असलेला उत्कट प्रेमभाव दर्शवण्यासाठी स्वतःला काय म्हणवतात ?
(3) (i) अंकिला - **अंकित झालेला** (ii) धेनु - **गाय** (iii) पाडस - **हरिणीचे पिल्लू** (iv) अग्निमाजी - **आगीच्या तडाख्यात**
(4) वनात वणवा पेटताच हरिणी आपल्या पाडसाच्या चिंतेने व्याकुळ होते. ज्याप्रमाणे पावसाची वाट पाहणारा चातक पक्षी ढगाला पाऊस पाडण्यासाठी विनवणी करतो, त्याचप्रमाणे हे विठ्ठल, तुझ्या कृपेची माझ्यावर बरसात व्हावी, म्हणून मी तुझी आळवणी करत आहे, असा अर्थ

कवी यातून व्यक्त करतो. हरिणी, चातक यांच्या उदाहरणांद्वारे कवीची परमेश्वर भेटीची तीव्रता, कळकळ व्यक्त होते. भक्ती, प्रेम, विरह, व्याकुळता अशा सर्व भावभावना उत्कटपणे येथे व्यक्त झाल्या आहेत. आपले पाडस संकटात असताना हरिणी कोणताही मागचा-पुढचा विचार न करता, जीवाची पर्वा न करता संकटात उडी घेते. त्याचप्रमाणे माझी विठूमाउलीचीही माझ्यासाठी धावत येईल, असा कवीला वाटणारा विश्वास यात दिसून येतो.

**(आ))**

**(1)** १. प्रस्तुत कवितेचे कवि/कवयित्री : संत नामदेव
२. प्रस्तुत कवितेचा विषय : देवाला आई मानून, देवरूपी मातेने बाळाचा म्हणजेच आपला सांभाळ मायेने करावा, अशी विनवणी करणारा हा अभंग आहे.
३. 'सवेंचि झेंपावें पक्षिणी । पिलीं पडतांचि धरणीं ।।
भुकेलें वत्सरावें । धेनु हुंबरत धांवे ।।'
अंकिला मी दास तुझा' या अभंगात संत नामदेव यांनी परमेश्वराकडे कृपेची याचना केली आहे. आई व तिचे बाळ, पक्षिणी व तिची पिल्ले, गाय व तिचे वासरू, हरिणी व तिचे पाडस, चातक आणि मेघ अशा मातृप्रेमाच्या विविध दृष्टांतांचा वापर करून ते परमेश्वराकडे दर्शनाची विनवणी करतात. प्रस्तुत ओळींमधून 'पक्षिणीची पिल्ले धरणीवर पडत आहेत हे पाहताच पक्षिणी पिल्लांना सावरण्यासाठी पृथ्वीवर झेपावते. वासरू भुकेले असेल तर त्याला आपला प्रेमपान्हा पाजण्यासाठी गाय हंबरत हंबरत वासराच्या दिशेने धाव घेते', असा आशय व्यक्त होतो. संत नामदेव श्री विठ्ठलाचे निस्सीम भक्त आहेत. ते परमेश्वरास विठुमाऊली म्हणतात. आपल्या पिल्लांना संकटात पाहून आईची होणारी तगमग, पिल्लाच्या भेटीची लागलेली ओढ, व्याकुळता याचे दाखले देत ते परमेश्वर भेटीची याचना करतात. विठुमाऊलीने आपल्याला दर्शन द्यावे, आपल्यावर दयेचा आणि कृपेचा वर्षाव करावा असा भाव व्यक्त करतात.
४. प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश : संत नामदेव देवाला आई मानून, आपला सांभाळ बाळाप्रमाणे करावा असे विनवतात. ज्याप्रमाणे बाळ पूर्णपणे आईवर विसंबून असते, त्याप्रमाणे आपणही देवचारानी लीन व्हावे; म्हणजे तो आईप्रमाणे आपला सांभाळ करील, असा दृढ विश्वास संत नामदेव या अभंगातून व्यक्त करतात ५. प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण - हि अभंगवाणी मला फार आवडली कारण या अभंगात संत नामदेव यांनी श्रीविठ्ठलाला आई संबोधून स्वतःचा सांभाळ करण्याची विनवणी केली आहे. कवितेमध्ये तुकारामांनी प्राणी आणि पक्षामधील आईचा दाखला फार सुंदर रित्या दिला आहे. आपल्या पिल्लांसाठी पक्षीण, पाडसासाठी हरीण, वासरांसाठी गाय कसे संकट काळी आपल्या पिल्लांची रक्षा करते याचे दाखले दिले आहेत. आई किती आपल्या किती जपते. देवानेही आपल्यावर मायेची पखरण नित्य करावी हा विचार मनाला भावाला.म्हणून हा अभंग मला फार भावला.

**(2)** १. नारायण सुर्वे
२. कष्टकरी कामगारांच्या आयुष्यातील दाहक वास्तवाचे चित्रण या कवितेत आले आहे.
३. कवी नारायण सुर्वे यांनी 'दोन दिवस' या कवितेमध्ये कामगार वर्गाच्या जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. रोजच्या पोटापाण्याच्या चिंतेत असणाऱ्या, कष्ट करून संकटांचा सामना करीत आपले जीवन जगणाऱ्या कामगाराची व्यथा या कवितेत मांडली आहे. पोटासाठी कष्ट करणाऱ्या कामगाराच्या आयुष्यातील काही दिवस सुखाची वाट पाहण्यात तर काही दिवस दु:ख आणि संकटांचा सामना करण्यात व्यतीत होतात. उर्वरित आयुष्यात असे अजून किती दुःखरूपी उन्हाळे पहायचे आहेत याचा अंदाज नसतो. होऊन गेलेल्या आणि येणाऱ्या उन्हाळ्याचा विचार करीत करीत कष्टकरी कामगाराचा एक एक दिवस जात असतो.
४. आयुष्यभर कष्ट करून व दारिद्र्यामध्ये जीवन व्यतीत करणाऱ्या कामगाराची व्यथा कवीने या कवितेत मांडली आहे. तरी त्या दुःखाने व दारिद्र्याने थकून न जाता पुन्हा ठामपणे उभा राहिलो, हा ठाम आशावाद इथे व्यक्त झाला आहे. दुःखावर विजय मिळवावा, अशा निर्धाराच मंत्र हि कविता सांगते
५. प्रस्तुत कविता माझ्या मनाला भावण्याचे कारण म्हणजे या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी जीवनाचे वास्तव चित्र दाहक शब्दात मांडले आहे. आयुष्य भर कष्ट करून दारिद्र्यात जगणाऱ्या कामगारांची व्यथा मांडली आहे. त्यातील त्यांनी भाकरीला दिलेली चंद्राची उपमा, अश्रूंना दिलेली मित्रांची उपमा अतिशय भावली. आयुष्य म्हणजेच आपली शाळा मानून कसे जीवन व्यथित केले. तरी सर्व दुःख असूनही ते दुःख कसे पेलावे व कसे जगावे हा आशावाद व्यक्त केला आहे. दुःखाला आपलेसे करून ना हारता आयुष्य कसे जगावे हे या कवितेतून कळते.

**3)**

**(1)** पणतीच्या उदाहरणातून कवितेत स्पष्ट केले आहे की अगदी छोट्या जीवातही जगाला काहीतरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते. प्रचंड तेजस्वी सूर्यालाही मावळताना पृथ्वीची चिंता वाटते कोणीतरी येऊन पृथ्वीला वाचवावे अशी अपेक्षा सूर्य करताना छोटीशी पणती पुढे येऊन नम्रपणे सूर्याला आश्वासन देत म्हणते, माझ्याकडून जेवढे होईल तेवढे मी पृथ्वीला प्रकाशित करण्याचे प्रयत्न करीत राहिन. छोटी पणती आपल्या कतृत्वाने तिच्यापेक्षा अधिक शक्तीशाली सूर्यालाही मदत करते.

**(2)** प्रथम कोणतेही काम स्वतः केले पाहिजे. त्यामुळे दुस-यांना आपल्याविषयी विश्वास निर्माण होतो. आपण कोणत्याही प्रकारचे कठीणातले कठीण काम करू शकते हेही दुस-यांच्या लक्षात येते. आपण स्वतः काम करू शकतो हे जर आपण दुस-यांना दाखवले, तर इतरांना आपण काम सांगू शकतो. आपल्याला येत नसताना दुस-यांना काम सांगणे योग्य नसते.

**(3)** लेखक डॉ. अनिल काकोडकर त्यांचे कॉलेजचे शिक्षण पूर्ण करून या संस्थेच्या ट्रेनिंग स्कूलमध्ये प्रशिक्षणासाठी दाखल झाले. तेव्हा त्यांना मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करण्यास सांगितले. त्यांच्या वरिष्ठांचा असा अनुभव होता कि यापूर्वी या कामावर ज्यांची नेमणूक झाली ते लोक कामाचे स्वरूप, त्यामधील बारकावे जाणून न घेता, काहीही न शिकता हाताखाली मदतनीसांची मागणी करीत. स्वत: काम शिकून घेण्यात कोणाला रस नसे. वरिष्ठांना हि बाब रुचली नव्हती. त्यांनी या कामासाठी कोणाची नेमणूक केली नाही. कदाचित यामुळेच मेटलायझिंग प्रक्रियेवर काम झाले नसावे.


TickMark.Ai | Mumbai

**4(अ))**

**(1))**
**(1)** उद्गारार्थी वाक्य
**(2)** आज्ञार्थी वाक्य

**(2))**
**(1)** कोण येतंय आपल्याकडे ?
**(2)** जगात सर्वसुखी असा कोणीही नाही.

**(3))**
**(1)** मळमळ व्यक्त करणे – नाराजी व्यक्त करणे.
बोनस कमी मिळाल्याने बाबांनी मळमळ व्यक्त केली.
**(2)** चेहरा पडणे - लाज वाटणे, शरमिंदे होणे
वाक्य - छोट्या छोट्या चुकांमुळे कमी मार्क्स पडले म्हणून सारिकाचा चेहरा पडला.
**(3)** मोर्चा वळवणे - विशिष्ट दिशेने जाणे
वाक्य - अभिषेकच्या आवडते खेळण्याचे दुकान दिसताच त्याने मोर्चा दुकानाकडे वळविला.

**(आ))**

**(1))**

**(1))**
**(1)** (i) प्रजा - लोक
(ii) प्रत - नक्कल

**(2))**
**(1)** (i) कल्याण x अकल्याण
(ii) कष्टाळू x कामचोर

**(3))**
**(1)** (i) शेंगा - शेंग
(ii) गणित - गणिते

**(4))**
**(1)** कमी आयुष्य असणारा - अल्पायुषी

**(2))**
**(1)** निसर्गाने घेतलेलं हे वळण आहे.
**(2)** विनम्र

**(3))**
**(1)**

| चिन्ह | नांव |
|---|---|
| ? | प्रश्न चिन्ह |
| ; | अर्ध विराम चिन्ह |
| ! | उद्गार चिन्ह |
| ‘ ’ | एकेरी अवतरण चिन्ह |

**(2)** सुश्रुत, ओळखलंस मला? अरे, मी आहे कविता.

**5(अ))**

**(1))**
**(1)**

**(2))**

**(आ))**

**(1))**
**(1)**



TickMark.Ai

| |
|---|
| व्यायामात् लभते स्वास्थ्यम् । दीर्घायुष्यम् बलम् सुखम्।।<br>प्रभू योगाभ्यास केंद्र<br>आजच आपले आरोग्य सुधारूया.<br>• तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांकडून शात्रोक्त मागदर्शन.<br><br>• वातानुकूलित खोल्यांची सोय.<br>• आसन, प्राणायाम, ध्यान यांचे प्रशिक्षण.<br>• माफक शुल्क.<br>• स्त्री, पुरुषांसाठी वेगळ्या वर्गाची सोय.<br>• विशिष्ट आरोग्यविषयक समस्यांसाठी खास वर्ग.<br><br>• रोगमुक्त जीवनाची गुरुकिल्ली.<br>• जेष्ठ नागरिकांसाठी खास सवलत योजना. |
| सदर योगवर्गाची वेळ<br>सकाळी ६ ते ७, ७ ते ८ व ८ ते ९<br>आणि संध्याकाळी ७ ते ८<br>नाव नोंदवणीसाठी संपर्क करा. |
| पत्ता: महात्मा गांधी चौक, गुजरात<br>दूरध्वनी: ०२२- २२२०००७०७४<br>इ-मेल: parbhuyogcenter@gmail.com<br>वेबसाईट: www.prabhuyogcenter.in |

**(2))**

**(1)** दै लोकसेवा पत्र

जागतिक वृद्ध दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

आधारवड वृंद्धनिवास तर्फे जागतिक वृद्ध दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाच आयोजन संपन्न.

ता. 2 मार्च, 2019.

आमच्या प्रतिनिधीकडून,

जागतिक वृद्धदिनानिमित्त ता. 1 रोजी आधारवड वृद्धनिवास निर्मलनगर, पुणे येथील संस्थेने सायं ५वा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये गायन-वादन कथाकथन अश्या विविध कलांचा समावेश करण्यात आला होता. रसिक मित्रमंडळ, पुणे यांनी विविध गुणांनी कार्यक्रमात बहार आणून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. मोफत प्रवेश आणि सस्नेह निमंत्रण यामुळे प्रचंड प्रेक्षक वर्ग उपस्थित होता.

या कार्यक्रमामुळे वृद्धांच्या जीवनातील मरगळ जाऊन मन आनंदाने नाचत होते हे दिसून आले. सर्व ठिकाणी आधारवडमधील वृद्ध आपुलकीने व उत्साहाने कार्यक्रमामध्ये सहभागी झालेले दिसून येत होते. अश्या आनंद सागरात हा सोहळा सम्पन्न झाला.

**(3))**

**(1)**

**(इ))**

**(1))**

**(1)** **पावसाळ्यातील एक दिवस**

पावसाळा म्हणजे निसर्गाचा उत्सव. जून ते सप्टेंबर या कालावधीत पाऊस आपले आगमन करून मनाला आनंद देतो. सुरुवातीला तो चातकासारखी वाट पाहायला लावतो, तर कधी अचानक कोसळून सर्वत्र आल्हाददायक वातावरण निर्माण करतो. मृदुगंध, हिरवीगार शेती, ओल्या गवताचा गंध, आणि भिजलेल्या पाखरांचे थरथरणे हे सर्व दृश्य डोळ्यांना सुखावणारे असते.

पण यंदाचा पाऊस काहीसा वेगळा ठरला. सुरुवातीला समाधान देणारा पाऊस नंतर जीवघेण्या पूरस्थितीला कारणीभूत ठरला. सातत्याने कोसळणाऱ्या पावसाने शेतकरी, नागरिक, आणि निसर्ग साऱ्यांनाच त्रस्त केले. शेते पाण्याखाली गेली, फळभाज्या नासल्या, आणि गावखेड्यांतून पुराचे महाभयानक चित्र दिसू लागले.

एका सायंकाळी भाजी खरेदीसाठी घराबाहेर पडले होते. अचानक जोरदार पाऊस सुरू झाला. विजांचा कडकडाट, अंधार, आणि वाढणारे पाणी पाहून मनात भीती निर्माण झाली. माझ्या सोबत अनेक लोक रस्त्यावर अडकले होते. एका मैत्रिणीची अस्वस्थता वाढली कारण तिच्या लहान मुलांची तिला काळजी होती. पावसाचा विचार न करता ती घराच्या दिशेने निघाली. पण दुर्दैवाने रस्त्यावर पडलेल्या

TickMark.Ai

पाण्याच्या लोंढ्यामुळे ती अडकली.

तो दिवस मन हेलावून गेला. पाऊस, जो आनंद देतो, तोच कधी कधी विनाशाचे रूप धारण करतो. त्या दिवसाने पावसाची दोन्ही रूपं दाखवली – आल्हाददायक आणि भयावह. तो दिवस खरंच विसरणे शक्य नाही.

**(2))**

**(1)** **पुस्तकाचे आत्मवृत्त**

एकदा सकाळी उठण्यास फारच वेळ झाळा. मन आळसावले होते. अभ्यासाचा खोलीत जाऊन नुसताच टेबला जवळील खुर्चीवर बसलो होतो. टेबलावर पुस्तके अस्ताविस्तपणे पडली होती. मी मनामध्ये कांही विचारकरीत होतो. तोच माझ्या कानांवर कांही शब्द पहले अरे नुसताच काय बसतोस या पुस्तकांच्याकडे बघता हल्ली बरीच पुस्तके तु हातात घेतोस आणि ठेवून देतोस. मलाही तसेच करतोस. आमचा तुला कंटाळा आला आहे काय? या शब्दानी मी भानावर आलो. पाहतो तर इतिहासचे पुस्तक माझ्याशी चक्क बोलत होते. ते सांगत होते कि माझा जन्म एका नामवंत इतिहास संशोधकांच्या घरी झाला. त्यामुळे माझी किंमत वाढलेली होती. त्यामुळे मला खूप मागणी होती. मी अनेकांच्या घरी होते. माझी ज्ञानी माणसांबरोबर मैत्री झाली. मी सर्वांना खूप आवडत होते. माझा या सर्व लोकांना खूप उपयोग होत होता. त्यांच्या ज्ञानामध्ये खूप मोठी भर पडत होती माझ्यामध्ये खूप संशोधनाची माहिती असलेले सर्वजण माझा वारंवार उपयोग करून घेत होते. इतर पुस्तकापेक्षा मला जरा जास्त मान मिळत होता.

आता पुस्तकांचे स्वरूप बदलत चालले आहे. नवीन डिजीटल तंत्रज्ञानामुळे संगणकावरच बरीच पुस्तके उपलब्ध होतात. त्यामुळे पुस्तकांचा वापर कमी होत चालला आहे. हा वापर कमी झाल्यामुळे बरे वाटते कारण आम्हाला वाचण्यासाठी सारखे हातात घेवून घेवून आम्हाला फाडून टाकले जाते. आमच्याकडे कोणी लक्षपण फारसे देत नाही. त्यामुळे आम्हाला आता थोडा आराम मिळतो. याचा आनंद आहे अरे पण हा आनंद जास्त काळ टिकणार नाही. कारण जर सर्व पुस्तके संगणकावर उपलब्ध झाली तर पुस्तकाला मागणी कमी होणार त्यांची छपाईकमी होणार. बाजारात पुस्तके मिळणार नाहीत. मग गरीबाती काय करावयाचे? त्यांना संगणक घेणे परवडणार नाही आणि ते चांगल्या ज्ञानापासून वंचित राहतील याची खंत वाटते. दारावरील टकटकीने मी भानावर आलारे. दारात आई चहाचा कप घेवून उभी होती. मी चहा घेवून पुस्तकाचा विचार करत असता पुस्तकाचे म्हणणे बरोबर आहे. याचा आपण विचार केला पाहिजे असे वाटले.

**(3))**

**(1)** **मी माझ्या देशाचा नागरिक**

मी माझ्या देशाचा एक जबाबदार नागरिक आहे. मला माझ्या हक्क आणि कर्तव्ये यांची जाणीव आहे. मी देशाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि त्याच्या प्रगतीसाठी योगदान देण्यासाठी सदैव तत्पर आहे.

मला माझ्या देशाच्या सदयस्थितीचे ज्ञान आहे. मला देशासमोर असलेल्या आव्हानांची आणि संधींची जाणीव आहे. मी देशाच्या उज्वल भविष्यासाठी योगदान देण्यासाठी प्रयत्नशील आहे. मी माझ्या वर्तणुकीतून एकआदर्श नागरिक असल्याचे दर्शवितो. मी कायद्याचे पालन करतो आणि इतरांनाही ते पालन करण्यास प्रोत्साहित करतो. मी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखतो आणि इतरांनाही तेच करण्यास प्रेरित करतो.

माझ्या मनात देशप्रेम आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रबळ आहे. मला माझ्या देशाचा अभिमान आहे आणि मी त्याचा सन्मान करतो. मी देशासाठी काहीतरी चांगले करण्याची इच्छा बाळगतो. मी माझ्या देशाचा नागरिक असल्याचा मला अभिमान आहे. मी माझ्या देशासाठी काय करू शकतो? मी देशाच्या कायद्यांचे पालन करू शकतो. मी माझ्या कर द्यायला कधीही टाळाटाळ करणार नाही. मी माझ्या देशाच्या प्रगतीसाठी योगदान देण्यासाठी कठोर परिश्रम करू शकतो. मी देशाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सदैव तत्पर आहे. मी माझ्या देशाचा सन्मान करू शकतो आणि इतरांनाही तेच करण्यास प्रोत्साहित करू शकतो. मी देशासाठी काहीतरी चांगले करण्याची इच्छा बाळगतो.

मी माझ्या देशाचा एक जबाबदार नागरिक आहे आणि मला माझ्या देशासाठी काहीतरी चांगले करण्याची इच्छा आहे.

**All the Best**

TickMark.Ai